मराठवाडा नेता नांदेड 16.9.25 मंगळवा

# पद्मजा सिटी घरफोडी प्रकरणातील आंतरजिल्हा टोळीला अटक

## रोख ११ लाख ३७ हजार रुपये व १४ तोळे ५ ग्राम सोने जप्त



नांदेड : (म नेता)

शहरातील पद्मजा सिटी येथील घरफोडी चोरी प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी एका आंतरजिल्हा टोळीला पकडले असून तीन जणांविरुद्ध पोलिसांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपींकडून रोख रक्कमेसह २८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांचे सहकारी हे गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, पद्मजा सिटी येथील घरफोडी प्रकरणातील आरोपी हे साई बाबा कमान येथून जात असल्याची माहिती मिळाली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांना सदर माहिती देऊन सदर आरोपी हे एका चारचाकी वाहनातून जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी साई बाबा कमान येथे सापळा रचला व त्याचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. त्यांना मामा चौक येथे पकडले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी एम एच २६ बी सी ८४४० क्रमांकाच्या कारला ताब्यात घेतले. कारमधील शेख शफु उर्फ शेख बिल्डर शेख मोईन, शेख उमेर उर्फ अमु शेख पाशा, नंदकिशोर वामन देवसरकर यांना ताब्यात घेऊन यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी पद्मजा सिटी येथे चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून रोख ११ लाख ३७ हजार, १४ तोळे ५ ग्राम सोने असा २८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपींनी वापरलेली ७ लाख रुपयांची कार ताब्यात घेतली. पोलिसांनी चौकशी केली असता सदर आरोपींनी पद्मजा सिटी येथे मोटारसायकल वरुन जाऊन चोरी केल्याची कबुली दिली. सदर गुन्ह्यांतील आरोपी शेख उमेर उर्फ अमु शेख पाशा यांनी गुन्ह्यांतील आरोपींने निझामबाद येथील मुस्तफा सोन्या चांदीचे दुकानात दागिने विक्री केली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सदर प्रकरणात ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी दिली आहे. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय, पोलिस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, साईनाथ पुयड, महेश कोरे, आनंद बिच्चेवार व त्यांचे कर्मचारी रविशंकर बामणे, चंद्रकांत स्वामी, मिलिंद नरबाग यांच्यासह अनेक जणांचा समावेश आहे.